# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ४३

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०५.२०२० वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे- २०२० ची मासिक मा. महापालिका सभा बुधवार दिनांक २०.०५.२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर

३) मा.दत्तात्रय बाबूराव साने

४) मा.बुर्डे सुवर्णा विकास

५) मा.गोफणे अनुराधा देविदास

६) मा.लांडगे रवि लक्ष्मण

७) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

८) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

९) मा.फुगे भिमाबाई पोपट

१०) मा.सावळे सिमा रविंद्र

११) मा.अनुराधा गणपत गोरखे

१२) मा.अश्विनी भिमा बोबडे

१३) मा.संजय बबन नेवाळे

१४) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

१५) मा.घोलप कमल अनिल

१६) मा.पवळे सुमनताई मधुकर

१७) मा.जावेद रमजान शेख

१८) मा.बाबर शर्मिला राजू

१९) मा.अमित राजेंद्र गावडे

२०) मा.ढाके नामदेव जनार्दन

२१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

२२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

२३) मा.सुजाता सुनिल पालांडे

२४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

२५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

२६) मा.पवार मनिषा प्रमोद

२७) मा.अभिषेक गोविंद बारणे

२८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

२९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

३०) मा.कलाटे राहुल तानाजी

३१) मा.कामठे तुषार गजानन

३२) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

३३) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

३४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

३५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

३६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

३७) मा.संतोष बबन कांबळे

याशिवाय मा.संतोष पवार- मा.अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.इंदलकर, मा.बोदडे- सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

----

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सभागृहात गणसंख्या नसल्यामुळे गणसंख्येअभावी ही सभा तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** गणसंख्येअभावी आजची सभा सोमवार दि.१/६/२०२० रोजी दुपारी १.३० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

(मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

### मा.महापालिका सभा
### कार्यपत्रिका क्रमांक – ४३
### सभावृत्तांत
### (दि.२०/५/२०२० (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)

दिनांक – १.६.२०२० वेळ – दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे- २०२० ची तहकूब मा. महापालिका सभा सोमवार दिनांक १.६.२०२० रोजी दुपारी १.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

११) मा.बुर्डे सुवर्णा विकास

१२) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोईनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.प्रमोद कुटे

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा.शैलजा अविनाश मोरे

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.करुणा शेखर चिंचवडे

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.जयश्री वसंत गावडे

६९) मा.कोमल दिपक मेवानी

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.सुजाता सुनिल पालांडे

७३) मा.योगेश मंगलसेन बहल

७४) मा.कदम निकीता अर्जुन

७५) मा.संदिप बाळकृघ्या वाघेरे

७६) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७७) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७८) मा.नढे विनोद जयवंत

७९) मा.पाडाळे निता विलास

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा.कोकणे संतोष अंकुश

८२) मा.पवार मनिषा प्रमोद

८३) मा.बारणे अर्चना तानाजी

८४) मा.अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८६) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

८७) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८) मा.बारणे माया संतोष

८९) मा.निलेश हिरामण बारणे

९०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९१) मा.दर्शले रेखा राजेश

९२) मा.कलाटे राहुल तानाजी

९३) मा.ममता विनायक गायकवाड

९४) मा.कामठे तुषार गजानन

९५) मा.चोंधे आरती सुरेश

९६) मा.कस्पटे संदिप अरुण

९७) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९८) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९९) मा.सुनिता हेमंत तापकीर

१००) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०१) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२) मा.कुटे निर्मला संजय

१०३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०५) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०६) मा.मुंढे उषा अंकुश

१०७) मा.कदम शशिकांत गणपत

१०८) मा.लोखंडे चंदा राजू

१०९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११०) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१११) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११६) मा.नवनाथ दत्तू जगताप

११७) मा.संतोष बबन कांबळे

११८) मा.सोनवणे शारदा हिरेन

११९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२०) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२१) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२२) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२३) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

(कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सभा आयोजनाकामी केलेल्या उपाययोजनानुसार काही सन्मा.नगरसदस्यांना On Line सभेमध्ये सहभागाकरिता मा.गटनेते यांचेमार्फत सन्मा. सदस्यांची नावे सभेपूर्वी देणेबाबत कळविणेत आले असता मा.तापकीर विनया प्रदिप (आबा), मा.गीता सुशिल मंचरकर, मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे व मा.वाघमारे आश्विनी विक्रम हे सन्मा.सदस्य On Line सभेमध्ये सहभागी झाले असल्याचे मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी कळविले असल्याने सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ११३ नुसार सदर उपरोक्त चार सन्मा.सदस्य पुर्णवेळ सभेस हजर होते असे मानन्यात यावे तसेच त्यांच्या रितसरपणे हजेरीपत्रकावर स्वाक्ष-या घेवून हजेरी नोंदविणेत यावी याप्रमाणे मा.महापौर यांनी लेखी निर्देश दिले असल्याने त्याप्रमाणे सभावृत्तांतात नोंद घेणेत आली असे.)

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.पाटील-अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील- शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.तुपे, मा.निकम, भालकर - सह शहर अभियंता, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.अलमलेकर, मा.जोशी, मा.खांडेकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.बोदडे- सहा.आयुक्त, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठाता वायसीएमएच, मा.तांबे, मा.कुकर्णी, मा.वाघुंडे- कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.राजेंद्र गावडे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करताना संबंधित जमिन मालकास मोबदला अदा करताना मा.महापालिका सभा ठराव क्र.३९९ दि. २१/११/२०१३ नुसार मंजूर कार्यपध्दतीत व धोरणानुसार कार्यवाही करावयाच्या प्रकरणात नुकसान भरपाई अदा करताना ३०% दिलासा रक्कम देण्यास मान्यता देणेत आली आहे. तदनंतर मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४ दि.२०/११/२०१५ अन्वये सदर धोरणात बदल करून नविन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतूदी नुसार ज्या मिळकत धारकांचे क्षेत्र ० ते ३०० चौ मी. आहे अशा बाधित छोट्या छोट्या मिळकतधारकांना १००% दिलासा रक्कम व ३०० चौ.मी पेक्षा जास्त क्षेत्राचे भूखंड धारकांना ३०% दिलासा रक्कम या प्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे. सबब, दि.२०/११/२०१५ नंतर ३०० चौ.मी. पेक्षा मोठ्या भूखंडाचे विभाजन करून तुकडा ३०० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड केलेल्या सर्व प्रकरणात सांत्वना रक्कम ३०% इतकीच देय राहिल यास मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबु -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५४१ विषय क्रमांक – १

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव–

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५९६५ दि.२७/११/२०१९

३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४८३ दि.०६/०१/२०२०

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४९६ दि.२०/०१/२०२०

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.संतोष लोंढे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५४२ विषय क्रमांक – २

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३३ दि.२०/३/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या हद्दीतील आजपर्यंत विविध वास्तुंना म्हणजेच चौक, उद्याने, रस्ते, वस्ती व इतरत्र ठिकाणी नामनिर्देशक फलक करण्यात आले आहेत. तसेच उड्डाणपुल व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींना देण्यात आलेले "महात्मा ज्योतिबा फुले" हे नाव चुकीचे असुन त्यात दुरुस्ती करुन "महात्मा जोतीराव फुले" हे योग्य व महाराष्ट्र शासनाच्या वतीने वापरात असलेले नाव देणेस. तसा अध्यादेश काढणेस आणि आजपासून संपुर्ण महानगरपालिकेच्या कामकाजात सुद्धा "महात्मा जोतीराव फुले" असा उल्लेख करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ३

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३७ दि.८/५/२०२० अन्वये.

श्री.सुरेश पुंडलिक साळुंके, मुख्य उद्यान अधिक्षक हे माहे फेब्रुवारी २०२० अखेर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले असून सदरचे पद रिक्त झालेले आहे. सदर मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर उद्यान अधिक्षक पदावरील कार्यरत कर्मचा-यांपैकी श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड, उद्यान अधिक्षक हे सेवाजेष्ठ असुन सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत आहेत. तरी मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड (उद्यान अधिक्षक) यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे कार्यकारी अभियंता (वि) या पदाचे एकुण ८ पदे शासन मंजूर असून सद्य स्थितीत एकुण ६ कार्यकारी अभियंता (वि) कार्यरत आहेत. उर्वरीत २ रिक्त पदापैकी १ पद खुल्या संवर्गातील आहे. उप अभियंता (वि) या संवर्गातील श्री. चव्हाण माणिक मारुती यांची महापालिकेत एकुण सेवा २९ वर्षे पूर्ण झाली असून उप अभियंता (वि) या पदावर ११ वर्षे सेवा झालेली आहे. कार्यकारी अभियंता (वि) या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव श्री. चव्हाण माणिक मारुती, उप अभियंता (वि) हे धारण करत असुन उप अभियंता (वि) पदाची सेवाजेष्ठता यादीनुसार देखिल ते जेष्ठ असल्याने त्यांना खुल्या संवर्गात रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (वि) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे कार्यकारी अभियंता (वि) या पदाचे एकुण ८ पदे शासन मंजूर

असून सद्य स्थितीत एकुण ६ कार्यकारी अभियंता (वि) कार्यरत आहेत. उर्वरीत २ पदे रिक्त आहेत. उप अभियंता (वि) या संवर्गातील श्री. दिलीप श्रीरंग धुमाळ यांची महापालिकेत एकुण सेवा २९ वर्षे पूर्ण झाली असून उप अभियंता (वि) या पदावर ११ वर्षे सेवा झालेली आहे. कार्यकारी अभियंता (वि) या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव श्री. दिलीप श्रीरंग धुमाळ, उप अभियंता (वि) हे धारण करत असल्याने, उप अभियंता (वि) पदाचे सेवाजेष्ठतेनुसार, रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (वि) या पदावर त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५४३ विषय क्रमांक – ३

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३७ दि.८/५/२०२० अन्वये.

श्री.सुरेश पुंडलिक साळुंके, मुख्य उद्यान अधिक्षक हे माहे फेब्रुवारी २०२० अखेर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेले असून सदरचे पद रिक्त झालेले आहे. सदर मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर उद्यान अधिक्षक पदावरील कार्यरत कर्मचा-यांपैकी श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड, उद्यान अधिक्षक हे सेवाजेष्ठ असुन सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व अनुभव अर्हता धारण करीत आहेत. तरी मुख्य उद्यान अधिक्षक या पदावर श्री.दत्तात्रय नामदेव गायकवाड(उद्यान अधिक्षक) यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे कार्यकारी अभियंता (वि) या पदाचे एकुण ८ पदे शासन मंजूर असून सद्य स्थितीत एकुण ६ कार्यकारी अभियंता (वि) कार्यरत आहेत. उर्वरीत २ रिक्त पदापैकी १ पद खुल्या संवर्गातील आहे. उप अभियंता (वि) या संवर्गातील श्री. चव्हाण माणिक मारुती यांची महापालिकेत एकुण सेवा २९ वर्षे पूर्ण झाली असून उप अभियंता (वि) या पदावर ११ वर्षे सेवा झालेली आहे. कार्यकारी अभियंता (वि) या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव श्री. चव्हाण माणिक मारुती, उप अभियंता (वि) हे धारण करत असुन उप

अभियंता (वि) पदाची सेवाजेष्ठता यादीनुसार देखिल ते जेष्ठ असल्याने त्यांना खुल्या संवर्गात रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (वि) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे कार्यकारी अभियंता (वि) या पदाचे एकुण ८ पदे शासन मंजूर असून सद्य स्थितीत एकुण ६ कार्यकारी अभियंता (वि) कार्यरत आहेत. उर्वरीत २ पदे रिक्त आहेत. उप अभियंता (वि) या संवर्गातील श्री. दिलीप श्रीरंग धुमाळ यांची महापालिकेत एकुण सेवा २९ वर्षे पूर्ण झाली असून उप अभियंता (वि) या पदावर ११ वर्षे सेवा झालेली आहे. कार्यकारी अभियंता (वि) या पदाकरीता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव श्री. दिलीप श्रीरंग धुमाळ, उप अभियंता (वि) हे धारण करत असल्याने, उप अभियंता (वि) पदाचे सेवाजेष्ठतेनुसार, रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (वि) या पदावर त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ४

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ**– १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/५६/२०२० दिनांक ६/०५/२०२०

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे.

राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ६,४१,३४,९६१/- व १२,०५,३४,९७४/- असे एकुण र.रु. १८,४६,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०४/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे-

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १८४०७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १८४०७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५७४२ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१५७६५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- १०९७३<br>सी.एस.आर(एनजीओ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मार्फत बांधकाम - ४७९२ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ११४१० लाभार्थी | GOI+GOM=६८४.६०लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २२८.२० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **९१२.८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १०८१९ लाभार्थी | GOI+GOM=६४९.१४लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =२१६.३८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८६५.५२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्षानुवर्षे घंटागाडी कर्मचारी मानधनावरती काम करत आहेत. या कर्मचा-यांपैकी काही कर्मचारी मयत देखील झालेले आहेत. वास्तविक शहर स्वच्छतेच्या दृष्टीने आणि आता कोरोना प्रादुर्भावाच्या प्रार्श्वभूमीवर या घंटागाडी कर्मचा-यांनी अत्यंत उल्लेखणीय असे कामकाज केले आहे व करत आहेत. त्यामुळे या सर्व घंटागाडी कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेमध्ये कायम करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५४४ विषय क्रमांक – ४

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ**– १) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/५६/२०२० दिनांक ६/०५/२०२०

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ६,४१,३४,९६१/- व १२,०५,३४,९७४/- असे एकुण र.रु. १८,४६,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०४/२०२० अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे-

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १८४०७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १८४०७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १५७४२ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१५७६५ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- १०९७३<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम -४७९२ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ११४१० लाभार्थी | GOI+GOM=६८४.६०लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = २२८.२० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **९१२.८ लाख** | |
| निर्गत करणेत | १०८१९ लाभार्थी | GOI+GOM=६४९.१४लाख | GOI = २०००/-व |

| | | | |
|---|---|---|---|
| आलेला दुसरा हप्ता | | | GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =२१६.३८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८६५.५२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्षानुवर्षे घंटागाडी कर्मचारी मानधनावरती काम करत आहेत. या कर्मचा-यांपैकी काही कर्मचारी मयत देखील झालेले आहेत. वास्तविक शहर स्वच्छतेच्या दृष्टीने आणि आता कोरोना प्रादुर्भावाच्या प्रार्श्वभूमीवर या घंटागाडी कर्मचा-यांनी अत्यंत उल्लेखणीय असे कामकाज केले आहे व करत आहेत. त्यामुळे या सर्व घंटागाडी कर्मचा-यांना महानगरपालिका सेवेमध्ये कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५४५ विषय क्रमांक – ५

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

अ) दि.२०/०२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५४६ विषय क्रमांक – ६

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दिनांक १०/१/२०२० व २४/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २४/१/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ५४७ विषय क्रमांक – ७

दिनांक – १/६/२०२० विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती सभा</u>**

अ) दिनांक २०/२/२०२० व २७/२/२०२० चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर-** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

-----

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/४०८/२०२०
दिनांक - ९/०७/२०२०



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.